# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
**Website :** www.unipune.ac.in.

**Board of Examinations & Evaluation**
**Ganeshkhind, Pune - 411007**
**Phone: 2025621398**
**E-mail:** bee@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एस ॲण्ड टी/१५६९ दिनांक : २५/०९/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा)

**विषय :** सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४–२५ वर्षाकरिता (हिवाळी सत्र २०२४ व उन्हाळी सत्र २०२५) विशेष बाब म्हणून परीक्षेस प्रविष्ट होण्याची संधी उपलब्ध करून देणेबाबत...

**संदर्भ :** १.परिपत्रक क्र.२६५/२०२३ जा.क्र.सीबी/१२२९, दि. ०१/११/२०२३
२.परीक्षा/३५४७, दिनांक ०६/११/२०२३ चे पत्र
३.परीक्षा/एस ॲण्ड टी/४०७, दिनांक १६/०३/२०२४ चे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यांत येते की, मा. विद्यापरिषदेने दिनांक १४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या सभेमध्ये सत्रपूर्तता संपलेल्या परंतु, जे विद्यार्थी N+2+1 (अधिकार मंडळाच्या विशेष मान्यतेसह) याव्यतिरिक्त सध्या काही विषयांमध्ये अनुत्तीर्ण आहेत व ते त्यामुळे पदवी प्राप्त करू शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना फक्त अनुशेषामधील (बॅकलॉग) जे विषय आहेत ते पूर्ण करण्याची फक्त एक वर्षाची संधी देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून पुन:श्च एकदा ही संधी फक्त अंतिम वर्ष आणि अंतिमपूर्व वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे अनुशेष (बॅकलॉग) राहिले असतील अशाच विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहे. या संधी अंतर्गत नवीन किंवा पुर्नप्रवेश कोणत्याही परिस्थितीत देता येणार नाहीत. ही संधी फक्त शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील दोन्ही सत्रांमध्ये परीक्षेस प्रविष्ट होण्यास लागू राहील. या निर्णयानुसार खाली नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षमधील दोन सत्रांच्या (हिवाळी सत्र २०२४ व उन्हाळी सत्र २०२५) परीक्षेस प्रविष्ट होण्यास खालीलप्रमाणे संधी देण्यात येत आहे.

१. सर्व अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांनी अंतिम वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षा दिलेली आहे अशा **अंतिम वर्षातील** अंतर्गत सर्व परीक्षा व विद्यापीठीय लेखी परीक्षेचा अनुशेष (बॅकलॉग) असलेल्या विद्यार्थ्यांना संधी देण्यात येत आहे.

२. सर्व अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांनी अंतिम वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षा दिलेली आहे अशा **अंतिमपूर्व वर्षातील** अंतर्गत सर्व परीक्षा व विद्यापीठीय लेखी परीक्षेचा अनुशेष (बॅकलॉग) असलेल्या विद्यार्थ्यांना संधी देण्यात येत आहे.

३. वर नमूद केलेल्या क्र. १ व २ मध्ये अंतर्भूत न होणारे विद्यार्थी **पात्र असल्यास** अशा विद्यार्थ्यांनी विशेष बाब म्हणून संधी मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालयाकडे सर्व उपलब्ध व वैध कागदपत्रासह अर्ज सादर करावेत. अशा एक वर्ष संधीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मा. प्राचार्य यांनी प्रचलित अनुषंगिक अध्यादेश, विविध केंद्रिय व राज्यस्तरीय प्राधिकरणाचे निकष, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक मार्गदर्शक तत्वे व अटी या सर्वांबाबतची खातरजमा करून केवळ पात्र विद्यार्थ्यांचे विनंतीबाबत स्पष्ट अभिप्रायासह सर्व अर्ज परीक्षा विभागाकडे विनाविलंब सादर करावेत.

४. सदर संधीनुसार विद्यार्थ्यांना अंतिम किंवा अंतिमपूर्व वर्षात कोणत्याही कारणास्तव पुर्नःप्रवेश देण्यात येवू नयेत. याबाबत सर्वतोपरी दक्षता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी काळजीपूर्वक घ्यावी. सदर संधी अंतर्गत पुर्नःप्रवेश देण्यात आल्यास अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच त्यांना इर्मजन्सी बारकोडवर परीक्षेस बसविण्यात आल्यास त्याअनुषंगाने पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व विद्यापीठ अधिनियमानुसार संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांचेवर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

५. सदर संधीनुसार पात्र विद्यार्थ्यांनी नियमित सुरू असलेल्या अभ्यासक्रमांच्या पॅटर्ननुसार समकक्ष विषय विचारात घेवून परीक्षेसाठी प्रविष्ट व्हावे. वार्षिक पॅटर्न प्रमाणे जुन्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी सेमीस्टर पॅटर्ननुसार एका विषयास दोन समकक्ष विषय विचारात घेवून परीक्षेसाठी प्रविष्ट व्हावे.

६. वरील क्र. १ ते ५ मध्ये नमूद केलेल्या धोरणानुसार पात्र विद्यार्थ्यांना दोन सत्रामधील परीक्षांची विशेष संधी मिळाल्यानंतरच्या काळात यापैकी कोणत्याही विद्यार्थ्यांना भविष्यकाळात पुनःश्च संधी दिली जाणार नाही.

७. महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच याबाबत एकही विद्यार्थी परीक्षा विभागात पाठविण्यात येवू नये याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी. तसेच विहित वेळेत परीक्षा अर्ज सादर न करणे, विद्यार्थ्यांपर्यंत माहिती न पोहचणे इ. कारणामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये याची सर्वस्वी जबाबदारी/काळजी संबंधित महाविद्यालय/संस्था यांनी घ्यावी.

सदर पत्रातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा. तसेच सदर संधीनुसार एकही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची सर्वतोपरी काळजी/दक्षता आपल्या महाविद्यालय/संस्था प्रशासनाने घेवून उचित कार्यवाही करावी.

(डॉ. महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ